**राज्यातील पायाभूत विकास प्रकल्पांसाठी युनिक पायाभूत सुविधा आयडीबाबत मार्गदर्शक सूचना.**

# महाराष्ट्र शासन

## नियोजन विभाग

**शासन निर्णय क्र.युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२.

दिनांक : २५ ऑगस्ट, २०२५.

वाचा : १. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दिनांक २४ जानेवारी, २०२५.

२. नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक : युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दिनांक ९ जून, २०२५.

**प्रस्तावना :**

राज्यातील पायाभूत विकास कामांचे सुयोग्य नियोजन व्हावे, सुसूत्रता यावी, सर्व भागांचा समतोल विकास व्हावा व अनावश्यक खर्चात बचत व्हावी यासाठी प्रत्येक पायाभूत विकास प्रकल्पांसाठी युनिक आयडी शासन निर्णय, दिनांक ९ जून, २०२५ अन्वये प्रथमत: वर्धा जिल्ह्यामध्ये प्रायोगिक तत्वावर लागू करण्यात आला आहे. त्याकरिता युनिक पायाभूत सुविधा पोर्टल (Infra ID Portal) कार्यान्वित करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये वर्धा जिल्ह्यामधील ग्रामविकास विभाग, नगर विकास विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जलसंधारण विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व जलसंपदा विभागाच्या पायाभूत सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच उर्वरित सर्व विभाग व जिल्ह्यांमध्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक १ ऑक्टोबर, २०२५ पासून पायाभूत सुविधांसाठी युनिक आयडी देणे अनिवार्य असल्याचे तसेच प्रति सुविधा आयडीसाठी शुल्क आकारण्याबाबत दिनांक ९ जून, २०२५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आले आहे. यामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील पायाभूत विकास कामांचे सुयोग्य नियोजन व्हावे, सुसूत्रता यावी, सर्व भागांचा समतोल विकास व्हावा व अनावश्यक खर्चात बचत व्हावी यासाठी राज्यातील सर्व शासकीय कार्यालये, निमशासकीय कार्यालये, जिल्हा परिषद, महानगरपालिका व अन्य यंत्रणा यांना प्रत्येक पायाभूत विकास प्रकल्पासाठी **महाराष्ट्र संपत्ती पंजीकरण पध्दती ((महासंपत्ती)/Maharashtra Asset Register System (MARS) )** या पोर्टलवरुन शासन निर्णयाच्या दिनांकापासून युनिक आयडी क्रमांक घेणे अनिवार्य करण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र सुदूर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC) यांना पोर्टलची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी रु.१००/- इतके शुल्क आकारण्यात येणार आहे. युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टलवर गेल्या पाच वर्षात (२०२०-२०२५) निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांच्या नोंदीसाठी शुल्क आकारण्यात येऊ नये.

पोर्टलची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी जमा होणाऱ्या शुल्काच्या विनियोगाबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

अ) सदर शुल्काद्वारे जमा होणाऱ्या निधीचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा.

(१) युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टलच्या देखभाल दुरुस्तीसाठी,

(२) युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टलच्या सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी, अद्ययावतीकरणासाठी,

(३) युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टलसाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्यासाठी,

(४) युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टलच्या वापराबाबत आवश्यक प्रशिक्षणासाठी

ब) सदर शुल्काद्वारे जमा होणाऱ्या निधीमधून खालील बाबींसाठी विनियोग करण्यात येऊ नये.

(१) युनिक पायाभूत सुविधा आयडी पोर्टल व्यतिरिक्त अन्य प्रयोजनांसाठी,

(२) वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याव्यतिरिक्त अन्य खरेदीसाठी.

३. प्रत्येक विभागाला आणि स्थानिक स्वराज्य संस्थेला पायाभूत सुविधेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यापूर्वी ऑनलाईन युनिक आयडी क्रमांक घेण्यासाठीची कार्यपध्दती व इतर बाबी या विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णय, दिनांक ९ जून, २०२५ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार राहतील.

४. विभागाच्या/स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुविधा Geo tagging करण्याकरिता विभागाने नामनिर्देशित केलेल्या अधिकाऱ्यांसाठी लॉगईन क्रिडेन्शियल उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. त्याकरिता नामनिर्देशित अधिकाऱ्यांनी सोबत जोडलेल्या डिपार्टमेंट मास्टर, डेझिग्नेशन मास्टर, स्कीम मास्टर, ॲसेट मास्टर व कौन्सिल/कॉर्पोरेशन मास्टर लिस्ट मधील माहिती सोबत जोडलेल्या जिल्हानिहाय यादीतील संबंधित पालक शास्त्रज्ञ यांच्याकडे पाठवावी.

५. प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८२५१७३८५६०७१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

DEVARA RAJAGOPAL

Digitally signed by DEVARA RAJAGOPAL
DN: c=IN, o=Personal, title=3456, 2.5.4.20=289c22071cb588fd531df022c29ec89276ede6f8aa500df11ff3b1b80b6962cd, postalCode=411014, st=Maharashtra, serialNumber=742368efbe36a0eb883c9937836383a8be11eb15decb8029209db2953176e175, cn=DEVARA RAJAGOPAL
Date: 2025.08.26 17:42:15 +05'30'

**(डॉ.राजगोपाल देवरा)**

**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,

२. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
३. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
५. मा. उप सभापत्ती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
७. सर्व सन्माननीय सदस्य, विधानपरिषद / विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय, मुंबई,
१०. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
११. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
१२. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१४. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद), विधानभवन, मुंबई,
१५. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा), विधानभवन, मुंबई,
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१७. सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/मुख्य कार्यकारी अधिकारी,
१८. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
१९. आयुक्त, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपुर,
२१. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपुर,
२२. संचालक, संचालनालय, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२३. संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन व उपयोजन केंद्र, नागपूर,
२४. सर्व जिल्हा कोषागारे अधिकारी,
२५. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी,
२६. सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७. निवडनस्ती, कार्यासन-१४१२, नियोजन विभाग.

**( शासन निर्णय क्र.युपासु-२०२५/प्र.क्र.०७/का.१४१२, दि.२५ ऑगस्ट, २०२५ सोबतचे सहपत्र )**

डिपार्टमेंट मास्टर, डेझिग्नेशन मास्टर, स्कीम मास्टर, ॲसेट मास्टर व कौन्सिल/कॉर्पोरेशन मास्टर लिस्ट

| Department Master | | |
|---|---|---|
| **Sr.No** | **Department Name English** | **Department Name Marathi** |
| | | |

| Designation Master | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Department Name English** | **Department Name Marathi** | **Designation English** | **Designation Marathi** | **Jurisdiction** | **Edit/ Delete Rights to be Given (Y/N)** |
| | | | | | | |

| Scheme Master | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr.No** | **Department Name English** | **Department Name Marathi** | **Scheme Name English** | **Scheme Name Marathi** |
| | | | | |

| Asset Master | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Sr. No** | **Department Name English** | **Department Name Marathi** | **Asset Category English** | **Asset Category Marathi** | **Asset Name English** | **Asset Name Marathi** | **Geo-metry** | **GIS Layer Available (Y/N)** |
| | | | | | | | | |

| Council/Corporation Master | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **District Name** | **Taluka Name** | **Council** | **Corporation** | **Nagar Panchayat** | **Zilla Parishad** | **Others (pls specify)** |
| | | | | | | |

(शासन निर्णय क्र.युपासु-२०२५/प्र.क्र.७/का.१४१२, दि.२५ ऑगस्ट, २०२५ सोबतचे सहपत्र)

## DISTRICT-WISE LIST OF MRSAC GUARDIAN SCIENTIST

### KOKAN DIVISION

| Sr. No. | District | Name & Designation of Guardian Scientist | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | • Thane<br>• Palghar<br>• Mumbai<br>• Mumbai-Suburban | Smt. S.S. Deotale<br>Head and Associate Scientist,<br>Mumbai branch Office | ss.deotale@mrsac.gov.in |
| 2 | • Raigad<br>• Ratnagiri | Smt. Rashmi Bobade<br>Technical Assistant | rs.bobde@mrsac.gov.in |
| 3 | • Sindhudurg | Dr.(Ms.)S.R. Dhirde<br>Scientific Associate | sr.dhirde@mrsac.gov.in |

### AURANGABAD DIVISION

| Sr. No. | District | Name & Designation of Guardian Scientist | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | • Aurangabad<br>• Jalna | Smt.S.P.Rajankar<br>Associate Scientist | sp.rajankar@mrsac.gov.in |
| 2 | • Beed<br>• Dharashiv | Dr.P.B.Rajankar<br>Associate Scientist | pb.rajankar@mrsac.gov.in |
| 3 | • Nanded<br>• Hingoli | Shri S.V.Balamwar<br>Associate Scientist | sv.balamwar@mrsac.gov.in |
| 4 | • Parbhani<br>• Latur | Dr.I.K. Ramteke<br>Scientific Associate | ik.ramteke@mrsac.gov.in |

### PUNE DIVISION

| Sr. No. | District | Name & Designation of Guardian Scientist | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | • Pune | Dr. S.A.Patil<br>Head & Resources Scientist,<br>Pune Branch office | sa.patil@mrsac.gov.in |
| 2 | • Solapur | Dr. P.B. Rajankar<br>Associate Scientist | pb.rajankar@mrsac.gov.in |
| 3 | • Kolhapur | Dr. (Ms.) S.R. Dhirde<br>Scientific Associate | sr.dhirde@mrsac.gov.in |
| 4 | • Sangli<br>• Satara | Smt. A.S. Kolhe,<br>Scientific Associate | as.kolhe@mrsac.gov.in |

**NASHIK DIVISION**

| Sr. No. | District | Name & Designation of Guardian Scientist | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | • Nashik<br>• Ahmednagar | Dr.S.A.Patil<br>Head & Resources Scientist, Pune Branch Office | sa.patil@mrsac.gov.in |
| 2 | • Nandurbar<br>• Dhule<br>• Jalgoan | Dr.A.N. Shakya<br>Resources Scientist | an.shakya@mrsac.gov.in |

**NAGPUR DIVISION**

| Sr. No. | District | Name & Designation of Guardian Scientist | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | • Nagpur<br>• Bhandara | Dr.S.S. Verma<br>Associate Scientist | sanjeevs.verma@mrsac.gov.in |
| 2 | • Gondia<br>• Gadchiroli | Smt.S.P.Rajankar<br>Associate Scientist | sp.rajankar@mrsac.gov.in |
| 3 | • Chandrapur<br>• Wardha | Smt.S.P.Rajankar<br>Associate Scientist | sp.rajankar@mrsac.gov.in |

**AMRAVATI DIVISION**

| Sr. No. | District | Name & Designation of Guardian Scientist | Email ID |
|---|---|---|---|
| 1 | • Amravati<br>• Yavatmal | Dr.V.M.Kale<br>Scientific Associate | vivekm.kale@mrsac.gov.in |
| 2 | • Buldhana | Smt.S.P.Rajankar<br>Associate Scientist | sp.rajankar@mrsac.gov.in |
| 3 | • Akola<br>• Washim | Dr.S.M.Apturkar<br>Associate Scientist | sm.apturkar@mrsac.gov.in |

***********